बुधवार, दि २६ नोव्हेंबर २०२५ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक १२ वा ● किंमत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

जालना शहर महानगरपालिका;

# स्वच्छ अन् आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी मनपासाठी कटिबद्ध

## आयुक्त आशिमा मित्तल यांचे जनतेला सहकार्याचे भावनिक आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहर महानगरपालिकेची (मनपा) आर्थिक स्थिती अत्यंत नाजूक असून, मनपा फंडात (स्वनिधी) निधी शिल्लक नाही. त्यामुळे शहराच्या मूलभूत विकासासाठी आणि आगामी खर्चाची पूर्तता करण्यासाठी कर वसुलीवर तातडीने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे, असे स्पष्ट मत जिल्हाधिकारी तथा मनपा आयुक्त आशिमा मित्तल यांनी पत्रकारांशी संवाद साधतांना व्यक्त केले. शहरातील पत्रकार, नागरिक आणि मालमत्ता धारकांनी सहकार्य करावे, असे कळकळीचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**निधीची चणचण आणि आर्थिक नियोजन**

आयुक्त मित्तल यांनी मनपाच्या आर्थिक परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. मनपाकडे सध्या स्वनिधी पूर्णपणे रिक्त आहे. नागरोत्थान योजनेसाठी भरावयाचा ३० टक्के निधी देखील मनपाकडे उपलब्ध नाही.

तातडीच्या (Urjent) कामांची बिले वगळता इतर देयके देणे शक्य होत नाही. आगामी निवडणुकीसाठी (Election) अंदाजित सात ते आठ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, त्यासाठी निधी जमा करणे हे मोठे आव्हान आहे. या परिस्थितीत, मनपाने डीपीडीसी (DPDC) मधून तसेच ईतर माध्यमातून निधी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

प्रशासनाने महसूल वाढवण्यासाठी कर संकलन विभागात अधिकारी बदलले असून, थकीत मालमत्ता कराची वसुली करण्याचे कठोर निर्देश दिले आहेत. पत्रकारांसह सर्व थकीत मालमत्ताधारकांनी तात्काळ कर भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**स्वच्छता आणि शहराच्या प्रतिमेसाठी प्रयत्न**

आयुक्त मित्तल यांनी स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. शहरातील रस्ते किंवा पेव्हर ब्लॉकची कामे काही काळ थांबवता येतील, पण शहराची स्वच्छ्ता करणे आणि शहराची प्रतिमा (इमेज) सुधारणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. शहरात दर शुक्रवारी सायंकाळी स्वच्छ्ता मोहीम राबवली जात आहे. आयुक्त मित्तल यांनी स्वतः बाहेरून येऊन शहरात काम करत असल्याचे नमूद करून, जालना येथील नागरिकांना आपल्या शहरासाठी सक्रिय मदत करण्याचे आवाहन केले. कचरा टाकणाऱ्यांची माहिती मनपाकडे देण्याचे निर्देश त्यांनी दिले.



स्वच्छतेच्या दृष्टीने भटक्या कुत्र्यांचे केंद्र वाढवून त्याची क्षमता दररोज १६ ते १८ इतकी करण्यात आली आहे. मांस विक्रेत्यांना त्यांचे कचरा व्यवस्थापन करण्यासाठी एक निश्चित जागा देण्यात आली आहे.

**मूलभूत सुविधा आणि प्रशासकीय निर्णय**

मनपाने इतर मूलभूत सुविधा सुधारण्यासाठी देखील पाऊले उचलली आहेत. शहरात १८ नवीन आरोग्य केंद्रे सुरू केली आहेत, जिथे नागरिकांसाठी ओपीडी तपासणीची सुविधा उपलब्ध आहे. लवकरच शहरातील अतिक्रमण काढले जाणार आहे. तसेच ताब्यात असलेल्या ओपन स्पेस (मोकळ्या जागा) काढून घेऊन तिथे गार्डन (बगीचे) बनवले जातील.

शहरात ३५२ ओपन चेंबर्सपैकी २९७ चेंबर्सचे काम झाले आहेत. ५५ चेंबर्सचे काम अद्याप बाकी आहे, ते पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. रस्त्यांच्या मध्ये असलेले डिपी-पोल शिफ्टिंगसारखी तांत्रिक कामे देखील प्रगतीपथावर आहेत.

**पत्रकारांना आणि नागरिकांना आवाहन**

मनपा आयुक्त मित्तल यांनी स्पष्ट केले की, मनपात कर्मचारी कमी असून एजन्सीज जास्त आहेत. प्रशासनाची जबाबदारी पूर्ण करणे आवश्यक आहे, पण पत्रकार आणि जालनाकर नागरिकांच्या सहकार्याशिवाय शहराला स्वच्छ आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे शक्य नाही.

चांगल्या नगरसेवकाची व्याख्या हवी, त्यांनी आपल्या प्रभागातील स्वच्छता आणि कर पूर्ण भरुन घेणाऱ्यास चांगल्या नगरसेवकाची व्याख्या म्हणून अधोरेखित केली. नागरिकांनी कचरा व्यवस्थापनात सहभाग घ्यावा, थकीत कर तात्काळ भरावा आणि प्रशासनाला माहिती देऊन आपले कर्तव्य पार पाडावे, असे भावनिक आवाहन त्यांनी केले. शहराला स्वच्छ, सुंदर आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्यासाठी मनपा प्रशासन कटिबद्ध आहे, पण त्यासाठी प्रत्येक जालनाकराचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा आहे.

# आत्मविश्वासाने आणि निर्धाराने केलेले कठोर परिश्रम कधीही व्यर्थ जात नाहीत

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल; युवा महोत्सव-२०२५ उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** सध्याच्या काळात मुलींनी स्वावलंबी होणे अत्यंत गरजेचे झाले आहे. जीवनात कोणतीही गोष्ट अशक्य नाही, त्यामुळे मुलींनी प्रथम स्वप्न पहावे आणि ते पुर्ण करण्यासाठी खंबीरपणे उभे राहणे प्रथमतः आवश्यक आहे. प्रत्येक मुलीने स्वत:च्या क्षमतेवर विश्वास ठेवून आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रमाणिकपणे प्रयत्न करावेत. तरी आत्मविश्वासाने आणि निर्धाराने केलेले कठोर परिश्रम कधीही व्यर्थ जात नाहीत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषदेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सव-२०२५ चे आयोजन जिल्हा क्रीडा संकुलात करण्यात आले होते. यावेळी क्रीडा अधिकारी लता लोंढे, आरती चिल्लारे, राज्य क्रीडा मार्गदर्शक आशिष जोगदंड तर परिक्षक म्हणून डॉ.शोभा यशवंते डॉ.मारोती घुगे, डॉ.दिगांबर दाते व डॉ.कन्नुलाल पिठोरे, यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, यशाला शॉर्टकट नसतो. कठोर परिश्रमाला कोणताही पर्याय नाही. आज जे कष्ट केले जातील, ते उद्या नक्कीच चांगले भविष्य घेऊन येतील. त्यामुळे १६-२४ या वयातील विद्यार्थी जीवनातील जिद्दीने आणि मेहनत सातत्याने केल्यास यातून संपुर्ण जीवनभराची यशाच्या रुपाने शिदोरी प्राप्त होत असते. प्रत्येक मुलीने आपल्या ध्येयाच्या दिशेने सातत्याने आणि निष्ठेने काम करत रहावे, यशासाठी कष्ट करणे अनिवार्य आहे. जर तुम्ही आज कष्ट सहन केले, तर उद्या नक्कीच चांगले भविष्य प्राप्त होईल, असा महत्त्वाचा संदेश त्यांनी दिला. मुलींनी आत्मविश्वासाने कठोर परिश्रम करत आपले ध्येय साध्य करावे आणि उज्ज्वल भविष्याची निर्मिती करावी. काही अडचण असल्यास आपण सर्व मला जिल्हाधिकारी कार्यालयात भेटायला सुध्दा येवू शकतात, माझ्या कार्यालयात तुमचे नेहमी स्वागत आहे. असेही त्यांनी सांगितले.

युवकांमध्ये सर्वांगीण विकास साधणे, भारतीय संस्कृती आणि परंपरांचे जतन करणे, तसेच त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देणे, या प्रमुख उद्देशांने युवा म




होत्सवाचे आयोजन केले जाते. या महोत्सवामध्ये यशस्वी होणारे स्पर्धक राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी पात्र ठरतात. या महोत्सवात समूह लोकनृत्य, लोकगीत, वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला, एकांकिका, विज्ञान स्पर्धा, कथालेखन तसेच इतर सांस्कृतिक आणि रचनात्मक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. आजच्या युवा महोत्सवात १५ ते २१ वयोगटातील तरुण-तरुणींनी उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. युवा महोत्सवात सादर **पान २ वर**

# बसस्थानक परिसरात 'चल १० के १००'चा उधाण!

## सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध चक्रीचा फोफावला व्यापार

**दीपक शेळके**

**जालना -** जालना शहरातील बसस्थानक परिसरात चल १० के १००, बीस के २०० नसीब का खेल! अशा जोरजोरात ओरडत अवैध चक्रीचे अड्डे उघडपणे व बिनधास्तपणे सुरु असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. विशेष म्हणजे ही ठिकाणे सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतच येतात; तरीही पोलिसांना याची माहिती नसल्याचा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे पोलिस यंत्रणा स्वतः अनभिज्ञ कशी? हा गंभीर प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**पोलिसांना 'दर' ठरवून घेतल्याची चर्चा?**

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, या अवैध चक्रीवाल्यांकडून काही ठरावीक रक्कम नियमित घेतली जात असल्याची चर्चा शहरात जोरात आहे. त्यामुळेच हा नशिबाचा जुगार दिवसाढवळ्या आणि सर्वांच्या नजरेसमोर सुरु असल्याचे बोलले जात आहे. या आरोपांवर पोलिसांकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकलेली नाही.

**युवकांचा कुटुंबासह समाजातील समतोल बिघडतोय**

या प्रकारच्या जुगाराच्या धंद्यांमुळे शहरातील अनेक युवक आर्थिकदृष्ट्या संकटात सापडत आहेत. सुरुवातीला १०-२० रुपयांपासून सुरु झालेला मोह काही वेळातच शेकडो रुपयांवर जातो आणि अनेक युवकः उधारीत जातात, घरातील पैसे खर्च करतात, वाममार्गाला वळतात, कुटुंबातील वाद निर्माण होतात. जुगाराच्या या व्यसनाने काही युवक चोरी, लुबाडणूक किंवा गुन्हेगारीकडे वळत असल्याची धक्कादायक माहितीही स्थानिकांकडून समोर आली.

**बसस्थानक परिसर 'हॉटस्पॉट' - विद्यार्थ्यांही होतात बळी**

बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात येण्या-जाण्यामुळे हे ठिकाण चक्रीवाल्यांचे मुख्य केंद्र बनले आहे. विशेषतः प्रवासी, कॉलेज विद्यार्थी, कामगार यांच्यावर हा अवैध व्यवसाय मोहीमेसारखा खेळवला जातो. विद्यार्थी व नवतरुणांचे सहज पैसे गमावून मानसिक अस्थिरता वाढतेय, अशी पालकांच्या तक्रारी वाढत आहे.

**पोलिसांच्या निष्क्रियतेवर प्रश्नचिन्ह**

चक्रीचा हा उघडपणे सुरु असलेला धंदा थांबवण्याऐवजी पोलिसांकडून कोणतीही गंभीर कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

पोलिस ठाण्याच्या हद्दीत इतका मोठा अवैध धंदा कसा चालतो? स्थानिक उपायोजना कुठे आहेत? वरिष्ठांकडील गस्त पथक काय पाहते? अड्डे चालवणाऱ्यांवर कारवाई होते की संरक्षण दिले जाते?

सदर प्रकरणात जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून तातडीने चौकशी करून कडक कारवाई करावी अशी मागणी जोर धरत आहे. यासोबतच बसस्थानक परिसरात सीसीटीव्ही मॉनिटरिंग वाढवणे, सतत गस्त लावणे, जुगारविरोधी विशेष मोहिम हाती घेणे या मागण्या देखील पुढे येत आहेत.

# भारताचा राष्ट्रीय ग्रंथ

आजचा दिवस संपूर्ण देशात संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. आजच्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकारण्यात आले त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. भारतीय संविधानाला यावर्षी ७६ वर्ष पूर्ण होत आहे. गेली ७६ वर्ष संविधानाने देशाला एकसंध ठेवण्याचे काम केले आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही संविधानामुळेच जिवंत आहे. संविधान हा देशाचा राष्ट्रीय ग्रंथ आहे. देशाचे अखंडत्व संविधानामुळेच टिकून आहे. भारतातील विविधता, अनेक भाषा, संस्कृती, धर्म, जात, पंथ, वंश, वेगवेगळ्या चालीरीती, रूढी-परंपरा या सर्वांन एका सूत्रात बांधणारा गुरुमंत्र म्हणजे संविधान. आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही घडविण्याच्या व त्याचा सर्व नागरिकांस; सामाजिक आर्थिक व राजनैतिक न्याय; विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता; निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्यासर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ; आमच्या संविधानसभेत आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत. ही भारतीय संविधानाची उद्देशिका आहे. संविधानाची उद्देशिका हाच संविधानाचा आत्मा आहे. संपूर्ण संविधान याच उद्देशिकेवर आधारित आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत अधिकार आणि कर्तव्य यांना फार महत्त्व देण्यात आले आहे. स्वातंत्र्याचा हक्क, समतेचा हक्क, शैक्षणिक हक्क, सांस्कृतिक हक्क, धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क हे मूलभूत हक्क घटनेने नागरिकांना बहाल केले आहेत. त्याच बरोबर प्रत्येक नागरिकांनी राष्ट्रीय प्रतीकांचा मान राखणे, संविधानाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करणे, देशाचे सार्वभौमत्व कायम राखणे, देशाची अखंडता कायम राखणे, सार्वजनिक म ालमत्तांची काळजी घेणे, देशासाठी नेहमी तत्पर राहणे ही मूलभूत कर्तव्यही संविधानात दिली आहेत. आपल्या हक्कांसोबत आपल्या कर्तव्याचीही जाणीव करुन देणारे व जगातील सर्वात मोठे असणाऱ्या भारतीय संविधानाच्या निर्मितीचा इतिहास जाणून घ्यायला हवा. २६ जानेवारी १९३० ला लाहोर येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात पंडित नेहरूंनी तिरंगा फडकावून संपूर्ण स्वराज्याची घोषणा केली. त्याच महत्वपूर्ण दिवसाचे स्मरण म्हणून २६ जानेवारी हा दिवस संविधानाची अंमलबजावणी करण्यासाठी निवडण्यात आला. ९ डिसेंबर १९४६ ला घटना समितीचे कामकाज सुरू झाले. ११ डिसेंबर १९४६ रोजी डॉ राजेंद्र प्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. बी एन राव हे या समितीचे सल्लागार होते. या समितीत पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभ पंत, मौलाना आझाद, डॉ बाबासाहेब आंबेडकर, एस. आर. जयकर, सरोजिनी नायडू, हंसाबेन म ेहता, राजकुमारी कौर यांचा मान्यवर सदस्य म्हणून समावेश करण्यात आला होता. घटना समितीच्या ११४ बैठका झाल्या होत्या. घटना समितीने ११ उपसमित्या देखील नेमल्या होत्या. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसुदा समितीची स्थापना करण्यात आली. मसुदा समितीने सादर केलेला अंतिम म सुदा २६ नोव्हेंबर १९४७ रोजी स्वीकारण्यात आला. तोच २६ नोव्हेंबर हा दिवस आपण संविधान दिन म्हणून साजरा करतो. ४ नोव्हेंबर १९४७ रोजी भारताच्या संविधान समितीच्या मसुदा समितीने संविधानाचा कच्चा मसुदा तयार करून तो चर्चा विनिमयासाठी सभागृहात ठेवला. त्यावर २ वर्ष ११ महिने १८ दिवस इतकी प्रदीर्घ चर्चा झाली आणि त्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी तिचा स्वीकार करण्यात आला. संविधान समितीने मसुदा समितीवर सात सदस्यांची नियुक्ती केली होती. त्यापैकी एक मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांच्यानंतर अलादी कृष्ण स्वामी अय्यर, के. एम मुन्शी, गोपाल अय्यंगार, एम. माधवराव, मोहम्मद सादुल्ला, डी. सी. खेतान हे इतर सदस्य होते. असे जरी असले तरी त्यापैकी एकाचे निधन झाले होते, एक अमेरिकेत निघून गेले होते, एकाने राजीनामा दिला होता आणि एक सदस्य पूर्णवेळ राजकारणात व्यस्त होते. त्यामुळे संविधानाचा मसुदा तयार करण्याची पूर्ण जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर आली व त्यांनी ती जबाबदारी अत्यंत निष्ठेने आणि तन्मयतेने पार पाडली आणि एकट्यानेच संपूर्ण संविधानाचा मसुदा तयार करून तो घटना समितीचे अध्यक्ष डॉ राजेंद्र प्रसाद यांच्याकडे २६ जानेवारी १९४९ सुपूर्द केला. शेवटी २४ जानेवारी १९५० रोजी अंतिम बैठक झाली आणि २६ जानेवारी १९५० पासून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. भारत एक सार्वभौम प्रजासत्ताक राज्य बनले त्यामुळे २६ जानेवारी हा दिवस आपण मोठया उत्साहात प्रजासत्ताक दिन म्हणून साजरा करतो. संविधान निर्मितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. जगातील विविध देशांच्या संविधानाचा अभ्यास करुन डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वसमावेशक अशी राज्यघटना तयार केली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे,**
**९९२२५४६२९५**

# इस्राईल देशात बांधकाम नूतनीकरण क्षेत्रात रोजगाराची संधी

**जालना । प्रतिनिधी -** आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासह बांधकाम, आरोग्य व इतर क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात येत आहे.
यासाठी करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमापैकी एक असलेल्या इस्राईल आणि भारत यांच्यातील कराराद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करणे या अंतर्गत इस्राईल देशात प्लास्टरिंग काम १००० जागा, सिरेमिक टायलींग १०००जागा, ड्रायवॉल वर्कर ३०० जागा व मिस्त्रीकामासाठी ३०० जागा असे एकूण २६०० कर्मचाऱ्यांची मागणी करण्यात आलेली आहे.
यासाठी उमेदवार २५ ते ५० वयोगटातील दहावी पास पात्रताधारक उमेदवारांना इस्राईलमध्ये नोकरीची संधी मिळणार आहे. यासाठी बांधकाम क्षेत्रात काम करण्यास इच्छुक उमेदवारांनी https://tinyurl.com/6dp6cbs6 या गूगल फॉर्म लिंकवर उमेदवारांनी नोंदणी करावी. यासाठी अधिक सहाय्य व माहीतीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, दुसरा माळा, जालना या कार्यालयाशी प्रत्यक्ष ०२४८२-२९९०३३ या दूरध्वनीवर संपर्क साधावा किंवा कार्यालयाच्या क्षरश्रपरीक्षसरीसारळश्र.लो या ई-मेलवर संपर्क करावा, असे सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले केले.

पान १ वरुन

## आत्तविश्वासाने आणि ...

झालेल्या विकी गणेश कुलकर्णी यांच्या कुंभारापरी तू भिमा समाजाला घडविले, तसेच राणी उंचेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी कधी लागेल रे वेड्या तुला गोडी अभंगाची या गाण्यातील भावनात्मक आशय, शब्दांची ताकद आणि गायनशैली यामुळे श्रोते भारावून गेले. सर्व श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद देत गाण्याची प्रशंसा केली. युवा महोत्सव यशस्वीतेसाठी क्रीडा विभागातील संतोष प्रसाद, अमोल मुसळे, राहुल राठोड, राहुल गायके आणि हारुण शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांच्या मदतीला आता महाविस्तार ॲप

## मातीपासून मार्केटपर्यंत आता सगळं काही एका ठिकाणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** शेतकऱ्यांना हवामानातील बदल, बाजारपेठेतील अस्थिरता आणि माहितीच्या अभावामुळे अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. यावर उपाय म्हणून कृषी विभागाने 'महाविस्तार' हे एआय प्रणालीवर आधारित ॲप विकसित केले आहे. पवर शेतकऱ्यांसाठी मराठी माषेतील चॅटबॉट देण्यात आला असून या चॅटबॉटला शेतकरी प्रश्न विचारू शकतात, त्याची उत्तरे चॅटबॉट काही सेकंदात शेतकऱ्याऱ्यांना देतो. मातीपासून मार्केटपर्यंत आता सगळं काही एका ठिकाणी म हाविस्तार पच्या माध्यमातून मिळणार आहे. त्यामुळे विभागातील सर्व शेतकरी बांधवांनी महाविस्तार ॲप Google Play Store मधून इन्स्टॉल करून वापर करण्याचे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक सुनिल वानखेडे यांनी केले आहे. ॲप चालविण्यासाठी फार्मर आयडी अनिवार्य आहे. फार्मर आयडी नसल्यास ॲप वापरता येणार नाही. फार्मर आयडीत शेतकऱ्याचे नाव, पत्ता, मोबाईल नंबर, आधार क्रमांक व बँक खाते, जमिनाचा सातबारा उतारा, शेतीचे क्षेत्रफळ व पिकांची माहिती, शेतकऱ्याने घेतलेले कर्ज किंवा विमा योजना आदीच्या नोंदी केल्या आहे. महाविस्तार चॅटबॉट कृत्रिम बुद्धीमत्तेवर आधारित संगणकीय प्रणाली आहे. यात मजकुराद्वारे किंवा आवाजाद्वारे संवाद करण्याची क्षमता विकसित करण्यात आली आहे. चॅटबॉटचा उपयोग विविध सेवांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी मदत करण्यासाठी किंवा विशिष्ट काम पूर्ण करण्यासाठी केला जातो. छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर- ११४२३, जालना-१५११३ व बीड- ५९८९ जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी या ॲपचा वापर सुरू केला आहे.




हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# परतूरमध्ये पालिका निवडणुकीचे दुसरे प्रशिक्षण संपन्न



**परतूर । प्रतिनिधी -** नगर परिषद निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मंगळवारी दि. २५ नोव्हेंबर रोजी दुसरे प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रणाली तायडे यांनी दिली.दरम्यान, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, निवडणूक निरीक्षक तथा उपजिल्हाधिकारी भू-संपादन, छत्रपती संभाजीनगर विजय राऊत, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, नम्रता चाटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण देण्यात आल्याचेही निवडणूक निर्णय अधिकारी प्रणाली तायडे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी दीपक इंगोले यांनी सांगितले. नगरपालिका निवडणुकीसाठी २०० अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्त कर्मचाऱ्यांना मंगळवार दि. २५ रोजी श्री योगानंद विद्यालयात दुपारी १२ वाजता दुसरे प्रशिक्षण देण्यात आले. उपस्थित मतदान अधिकारी व मतदान कर्मचाऱ्यांना मतदान यंत्र कसे हाताळावे, सर्व प्रकारची कागदपत्रे कशी भरावी, मतदान यंत्र सील कसे करावे यासंदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली.याचवेळी ५० गुणांची परीक्षा घेण्यात आली. उपजिल्हाधिकारी सुकेशिनी पगारे यांनी प्रशिक्षणाला भेट दिली. निवडणुक विभागाचे नायब तहसीलदार विनोद भालेराव, पेशकार संतोष पवार, संजय कास्तोडे,सुनील राठोड,जावेद पठाण,बळीराम हिंगे आदींनी हे प्रशिक्षण दिले. तिसरे प्रशिक्षण दि. ०१ डिसेंबर रोजी पीएमश्री जवाहर नवोदय विद्यालय, आंबा या ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे.येणाऱ्या ०२ डिसेंबर रोजी मतदार होणार असून ०३ डिसेंबर रोजी निकाल घोषित करण्यात येणार आहे.

# एकता पदयात्रेस जालनेकरांचा उत्स्फूर्त सहभाग

**जालना । प्रतिनिधी -** लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त जालना शहरात मंगळवार दि.२५ नोव्हेंबर २०२५ रोजी भव्य एकता पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेत विद्यार्थी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भारत माता की जय, वंदे मातरम या देशभक्तीपर घोषणांनी शहर दुमदुमुन गेले.

कार्यक्रम जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासन व माय भारत, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, तहसीलदार छाया पवार, पोलीस प्रशिक्षण केंद्राचे केशव गिरडकर, सुरेश कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

सुरुवातीला सरदार वल्लभभाई पटेल व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पदयात्रेचा शुभारंभ करण्यात आला. तसेच पदयात्रेमध्ये एन.एस.एस, मॉडेल कॉलेज घनसावंगी, निर्मल क्रीडा मंडळ, विविध संस्था, विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ म्हणाले की, सशक्त, समृद्ध आणि आत्मनिर्भर भारतासाठी ‘एकता’ हा मूलभूत मंत्र प्रत्येक जनमानसात दृढ रुजला पाहिजे. देशाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी विद्यार्थ्यांनी मानसिक, शारीरिक व भावनिकदृष्ट्या सक्षम राहून परिश्रमाची तयारी ठेवावी. सरदार पटेल यांच्या जिद्द, नेतृत्वगुण आणि कार्यतत्परतेचा आदर्श सर्वांनी घ्यावा.

कार्यक्रमात उत्कर्ष थिएटर कलापथक यांच्याकडून नशामुक्ती विषयावरील पथनाट्य, तसेच देशभक्तीपर गीते सादर करण्यात आले. नशाविरोधी संदेश देणाऱ्या या पथनाट्यास उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेला सुरुवात झाली. पदयात्रा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते उडपी हॉटेल मार्गे फुल बाजार ते वीर सावरकर चौकापासून मामा चौक अशी मार्गस्थ होवून राष्ट्रगीताने समारोप करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोमनाथ खाडे, प्रा. उद्धव थोरवे, जयपाल राठोड, अभिजित भुतेकर व पोलीस प्रशिक्षण केंद्राचे कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# जगाला पर्यावरण संरक्षणाची नितांत गरज

जग विनाशाकडे वाटचाल करीत आहे.याकरीता जगाने पर्यावरण वाचविण्यासाठी संपूर्ण ताकदीनीशी पर्यावरणाचे संतुलन ठेवुन संरक्षण करण्याची गरज आहे. वाढते प्रदुषण रोखण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. पर्यावरणाची सुरक्षा व संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रानी पर्यावरणाच्या प्रती वैश्विकस्तरावर आणि राजनीतीक व सामाजिक जागृती आणण्याकरिता संयुक्त राष्ट्राने २६ नोव्हेंबर १९९२ला विश्व पर्यावरण संरक्षण दीवस साजरा करण्याची सुरुवात केली. त्यामुळे संपूर्ण जगात २६ नोव्हेंबर विश्व पर्यावरण संरक्षण दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो.आज संपूर्ण जग सुरक्षीत रहावे असे सर्वांना वाटते.परंतु जगातील मानवांच्या अतीरेकामुळे मोठ्या प्रमाणात जंगलतोड, खणन, नदीतील रेती खणन,त्याचप्रमाणे सोने,धातु,चांदी,हिरे, कोळसा व खनिज संपत्ती इत्यादीवर मानवाने सरळ घणाघाती प्रहार करून निसर्गाच्या मुळावरच मानवाने कुह्राड मारून मोठा घाव केल्याचे दिसून येते.यामुळे निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे. पर्यावरणाची ढासळती परीस्थिती पहाता पृथ्वीतलावरील संपूर्ण मानवजाती व जीव-जंतु भयभित झाल्याचे दिसून येते.त्यामुळे आज जगाला पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे.भारतात जंगल, पशु-पक्षी व प्राणी यांना सरकारकडुन संरक्षण मिळावे यासाठी २६ मार्च १९७४ ला गढवाल मधील हेनवलघाटी येथे गौरादेवी यांच्या नेतृत्वाखाली चिपको आंदोलनास सुरूवात झाली व पर्यावरण संरक्षणाची मिसाल जागृत केली. आज तसे पाहिले तर स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ मोठ्या प्रमाणात प्रदुषित झाल्याचे दिसून येते. मानवाने जर पर्यावरणाला वाचविले तर जलप्रदूषण, वायुप्रदूषण व स्थल प्रदुषण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरपूर मदत मिळु शकते. आज पर्यावरणात इतके प्रदुषण दीसुन येते की पक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले आहे. आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात जंगल तोड मोठ्या प्रमाणात होत आहे. याचाच परीणाम पर्यावनावर मोठ्या प्रमाणात होतांना दिसतो. भारतासह जगातील वाढती लोकसंख्या हीच पर्यावरण नियंत्रण ठेवण्यास मोठी अडचण असल्याचे मी समजतो. मानवाने आपल्या सुख-सुविधांसाठी पर्यावरणाकडे पुर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.आज पर्यावरणावर अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की जगावं की मरावं कारण आज पर्यावरणाचा आधारस्तंभ वृक्षआहे व त्याला साथ हवी जल व वायूची परंतु हे संपूर्ण दुषित झाल्यामुळे पर्यावरण धोकादायक स्थितीत येवून पोहोचले आहे. असेही सांगण्यात येते की पर्यावरणाच्या ढासळत्या परिस्थितीमुळे जगातील १० लाख प्राणी व वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.ज्या पक्ष्यांवर पर्यावरणाची धुरा आहे ते गिधाड पक्षी सुध्दा संपुष्टात येत आहे.मानवाने निसर्गावर एवढा अत्याचार केला की वृक्ष कटाईच केली नाही तर वृक्षांना जळामुळा सकट उपडुन फेकले.यामुळेच आज पर्यावरण मानवापासुन भयभीत झाले आहे. आज औषधोपयोगी वनस्पती पर्यावरणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे नस्तनाबुत होत आहे.त्याचप्रमाणे अनेक औषधोपयोगी वनस्पती लुप्त झाल्या आहेत.जगातील वाढत्या प्रदूषणामुळे ३० टक्के वृक्षप्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत आणि विविध देशांतील १४२ प्रजाती आधीच पृथ्वीतलावरून लुप्त झाल्या आहेत ही अत्यंत चिंताजनक आणि गंभीर बाब आहे.भारतात वृक्षांच्या २६०३ प्रजाती आहेत यातील ४६९ प्रजाती धोकादायक स्थितीत आहेत म्हणजेच भारतातही गंभीर समस्या आहे.आज पर्यावरणाचे संतुलन विस्कळीत झाल्यामुळे जंगलातील संपूर्ण प्राणी शहरात व गावात प्रवेश करतांना दिसतात यामुळे जिवीत हाणीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.यात हिंसक प्राणी शहरात व गावात प्रवेश करून मानव हानी व पाळीव प्राण्यांची हानी मोठ्या प्रमाणात होतांना दिसते.यामुळे जंगली प्राणी व मानव यांच्यात मोठ्या प्रमाणात शत्रृत्व दिसून येते.कारण जंगल संपदा नष्ट होत आहे यामुळे जंगलात रहाणारे पशु-पक्षी यांचे खान-पान ऐका-मेकांवर अवलंबून असते.परंतु जंगल तोडीमुळे अनेक प्राण्यांच्या व पक्षांच्या प्रजाती लुप्त होतांना दिसते किंवा त्यांची शिकार होतांना दिसते किंवा पर्यावणाच्या ढासळत्या परीस्थितीमुळे मृत्यृशी झुंज देतांना अनेक पशु-पक्षी दीसतात.त्यामुळे आज पर्यावरणाचे संरक्षण करण्याची प्रथम जबाबदारी मानवजातीची आहे ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.आज प्लास्टीकनेसुध्दा पर्यावरणाला प्रदुषीत केल्याचे दिसून येते.मानवाने स्वतःच्या स्वर्थासाठी पर्यावरणाचे जनुकाय संपूर्ण रक्त पिवुन निचोडुन ठेवल्याचे दीसुन येते. आज जगात विश्व शांतीसाठी पर्यावण वाचवीण्याची गरज आहे.आज मानवजातींमध्ये वाढणाऱ्या बिमाऱ्या,अनेक व्याधी व आरोग्याची ढासळती परिस्थिती ह्या सर्व पर्यावरणाच्या बिघडत्या संतुलनामुळे दिसून येतात.यामुळे आज मानवाचे आयुष्यमान दिवसेंदिवस कमी होतांना दिसून येते. पशुपक्षांचेतर जगने अत्यंत कठीण झाले आहे.जगात वाढते कारखाने आणि जगातील युध्दसामुग्रीची शर्यत व अनेक परमाणु परिक्षण यामुळे संपूर्ण जग प्रदुषीत होतांना दिसते. आज भारतातील जिवंत उदाहरण म्हणजे भारताची राजधानी दिल्ली प्रदुषणाच्या बाबतीत जगात प्रथम क्रमांकावर असल्याचे सांगितले जाते.याचाच अर्थ असा की दील्ली आज प्रदुषणाच्याबाबतीत महाभयानक परीस्थिती असल्याचे दिसून येते.आज प्रदुषणामुळे दिल्ली गॅसचेंबर बनले की काय असे वाटत आहे.या महाभयानक परीस्थितीत दील्लीवासी मास्कचा मोठ्या प्रमाणात वापर करतांना दिसतात.यामुळे असे वाटते की दील्लीमध्ये मास्क युग आले की काय असे वाटत आहे. संयुक्त राष्ट्राने १९९२ ला पर्यावरण संरक्षण करण्याची संकल्पना जाहीर केली होती.परंतु याबद्दल कीती देश अलर्ट, सतर्क व सजन आहे हे पहाने गरजेचे आहे.पर्यावरण संरक्षण करण्याची घोषणा करणे वेगळे आहे.परंतु त्याला कृतित कोणता देश रूपांतरित करतो त्याला जास्त महत्त्व आहे. कारण आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे.याचे उदाहरण म्हणजे अझरबैजान-आर्मेनिया युद्ध आणि गेल्या तीन वर्षांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध आणि आता सुरू असलेले हमास-हिजबुल्ला विरूद्ध इस्रायलचे भयावह युद्ध. त्यामुळे मानवजातीने आपल्या मृत्यृचीही व्यवस्था केल्याचे दिसून येते.मानवजातीने आता पर्यावरण वाचवीले नाही तर पृथ्वीचा विनाश अटळ आहे.याकरीता जगातील संपूर्ण देशांनी विश्व पर्यावरण संरक्षण दिवसाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम राबविला पाहिजे.आज पर्यावरण संरक्षणा करीता लोकसंख्येवर नियंत्रण असने गरजेचे आहे, वाढते शहरीकरण थांबवीले पाहिजे, कारखान्यांतील धुळ व दुषीत पाणी यांचा बंदोबस्त केला पाहिजे,भारतासह जगात अनेक वाहन दुषीत धुर ओकत असतात ते कुठेतरी थांबवीले पाहिजे. आज पर्यावरण विस्कळीत झाल्यामुळे व प्रदुषणामुळे मानवजातीच्या आरोग्यावर संकट ओढावले आहे यात कॅन्सर, टीबी, मधुमेह,हार्ड अटॅक, डोळ्यांचा त्रास इत्यादीसह अनेक व्याधी मोठ्या प्रमाणात दीसुन येतात.आज भारत प्रगतीपथावर आहे.परंतु पर्यावरणाच्या बाबतीत मागे असल्याचे दिसून येते.याचे जीवंत उदाहरण म्हणजेदील्लीतील प्रदुषण. त्यामुळे भारताने मुख्यत्वे करून पर्यावरण संरक्षणासाठी युध्दपातळीवर कार्य करण्याची गरज आहे. गेल्या ५ ते १० वर्षांपासून जगात अनेक महाप्रलय, मोठ्या प्रमाणात सुनामी,ग्लेशीअर वितळने,अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी,वनवे लागुन मोठ-मोठे जंगल संपदा जळुन खाक होने,भुकंप येणे, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण घटना निसर्गाचे संतुलन डगमगल्याने व पर्यावरणाची खुली हत्या केल्याने ह्या घटना घडत असल्याचे स्पष्ट दीसुन येते.त्यामुळे आज पर्यावरणाला वाचविण्याकरिता जगातील संपूर्ण देशांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. भारतात शहरांचे सौंदर्यकरन करण्याच्या उद्देशाने जंगल तोड करने बरोबर नाही. त्यामुळे भारत सरकारने जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे.यामुळे पर्यावण शुद्ध राहिल. पर्यावरन संरक्षण दिनाच्या निमित्ताने मी सरकारला एकच आव्हान करतो की जंगल तोड ताबडतोब थांबवली पाहिजे व ओसाड जागेवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करायला पाहिजे.त्याचप्रमाणे जनतेला मी एकच आव्हा करतो की २६ नोव्हेंबर पर्यावरण संरक्षण दीवसाचे औचित्य साधून या दीवशी प्रत्येकाने आपल्या घरासमोर एकतरी झाड लावावे जागा नसेल तर एखाद्या कुंडीत झाड लावावे व पर्यावरणाचे संरक्षण करावे ही आग्रहाची विनंती आहे.त्याचप्रमाणे सरकारने घर तीथे झाड ही मोहीम राबविली पाहिजे. वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा,पक्षांना आणि मानवाला फळ व सर्वांना सावली आणि ऑक्सिजन मिळेलयांच्या संगमाने शुध्द हवा मिळुन पर्यावरणात आल्हाददायक वातावरण निर्माण होईल.आज संपूर्ण जगाला पर्यावरण वाचवीण्याची हीच संधी आहे.ही संधी गमावून नये असे मला वाटते.आज पर्यावरण प्रदुषीत झाल्यामुळे नदी,नाले,तलाव, समुद्र प्रदुषित झाले आहे.यामुळे जलचर प्राण्यांच्या जीवाला मोठा धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे आज पर्यावरणाचे संरक्षण करण्याची संपूर्ण जबाबदारी विश्वातील संपूर्ण मानवजातीवर आहे त्या अनुषंगाने सर्वांनी पावुले उचलली पाहिजे. पर्यावरण सुरक्षीत तर पृथ्वी सुरक्षित,पृथ्वी सुरक्षित मानव, पशु-पक्षी सुरक्षित हेच धेय्य पुढे ठेवून पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे.आजच्या अत्याधुनिक युगात मोबाईल टॉवर मोठ्या प्रमाणात दीसुन येते यामुळेसुध्दा पर्यावरणावर विपरीत परिणाम होतांना दिसतो.यावरसुध्दा नियंत्रण आणन्याची गरज आहे.साडे तिनशे वर्षांपूर्वी संत तुकाराम महाराजांनी निसर्गाचे, पर्यावरणाचे आणि झाडांचे महत्व आपल्या अभंगातून सांगितले होते आणि त्याचे आज अनुकरण होण्याची गरज आहे.

वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे ! पक्षी सुस्वरे ! आळविता !! येणे सुख रूचे एकांताचा वास ! नाही गुणदोष ! अंगीयेता !!

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**मो.नं.९९२१६९०७७९ नागपूर.**

# आमचा माणुस कामाचा माणुस गणेश नानाच!

## प्रभाग ९ चे भाग्य उजाळणार



**परतूर । प्रतिनिधी -** परतूर नगर परिषदेचे रणांगण पेटले असून आत्तापर्यंत ९ नंबरच्या प्रभागावर सत्ता गाजविणार्याविरोधांत या प्रभागातील नागरीकांचा मोठ्या प्रमाणात रोष असुन या प्रभागात आपल्या सामाजीक कार्याच्या जोरावर किंवा सत्तेत नसतांना प्रत्येकाची अडचण सोडविण्यासाठी कायम तत्पर असणारे सामाजीक कार्यकर्ते गणेश नाना नळगे यांनी नागरीकांच्या सेवेसाठी बंधु तथा शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक ९ मधुन नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी उमेदवारी दाखल केली असुन त्यांना प्रचंड मतांनी निवडून आणण्याचा निर्धारच या प्रभागातील नागरीकांनी केला असुन या प्रभागात केवळ मशालच पेटणार असल्याचे चित्र दिसत आहे.

परतूर नगर पालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी चुरशीला पोहोचली असून प्रभाग क्रमांक ९ मध्ये वातावरण अक्षरशः तापले आहे. या प्रभागात गणेश नाना नळगे यांच्या मशाल या चिन्हावरील प्रचार जोरदार वेग घेत आहे. स्थानिकांमध्ये दिसणार्या उत्साहावरून

गणेश नाना नळगे यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे.विशेष म्हणजे युवक वर्गाचा मिळणारा मोठ्या प्रमाणातील पाठिंबा हा त्यांच्या प्रचारातील निर्णायक टप्पा ठरत आहे. प्रभागातील विविध भागात गणेश नाना नळगे यांच्या यज्ञ गाठीभेटी व छोट्या बैठकींना तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसत आहे. गणेश नाना नळगे यांनी मतदारांशी थेट संवाद साधत विकासाच्या मुद्यांवर चर्चा करत असून, प्रभाग ९ मध्ये मशाल चिन्हाची जोरदार लाट उमटल्याचे चित्र आहे.

## प्रभू रामचंद्रांच्या विवाह तिथीनिमित्त जालना राममय

# राम मंदिरात महाआरती

**जालना । प्रतिनिधी -** प्रभू श्री राम चंद्र आणि माता सीता यांच्या पावन विवाह तिथीचे औचित्य साधून अयोध्या येथील नव्याने उभारलेल्या भव्य राम मंदिरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळा पार पडला. या ऐतिहासिक घटनेच्या पार्श्वभूमीवर, देशभरातील राम मंदिरांमध्ये भक्तिमय वातावरण निर्माण करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. याच शृंखलेत, जालना शहरातही उत्साहाचे वातावरण दिसून आले.



जालना शहरातील बडी सडक येथील राम मंदिरामध्ये आज मंगळवारी भाजपच्या वतीने भव्य महाआरतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. पंडित व उपस्थित कार्यकर्त्यांनी पंचारती करून प्रभू रामचंद्रांची सामूहिक आरती केली. या सोहळ्याला भाजपचे पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे यांनी माध्यमांशी बोलताना या उत्सवाचे महत्त्व विषद केले.

# जागतिक बौद्ध धम्म परिषद नागेवाडीच्या नालंदा बुद्ध विहारात सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते उदघाटन

## समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे दिनेश आदमाने यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** भारताच्या ७५ व्या संविधान दिनाचे औचित्य साधून जालन्यातील नागेवाडी येथील नालंदा बुद्ध विहाराच्या वतीने जागतिक बौद्ध धम्म परिषद आणि भिक्खू संघाला चिवरदान महासंघदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम बुधवार, दिनांक २६ नोव्हेंबर रोजी सकाळपासून आयोजित करण्यात आला आहे.

या जागतिक धम्म परिषदेचे उद्घाटन सरसेनानी आनंदराज आंबेडकर यांच्या हस्ते होणार असून मार्गदर्शन होणार आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने देश-विदेशातून भिक्खू संघ नागेवाडी नालंदा बुध्द विहार येथे उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष दिनेश आदमाने यांनी दिली.

हा सोहळा जालना जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष दिनेश आदमाने यांनी जालना जिल्ह्यातील सर्व स्तरातील समाज बांधवांनी या जागतिक बौद्ध धम्म परिषदेला आणि चिवरदान सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

# निवडणुका पुढे ढकलण्याची शक्यता कमी

## सर्वोच्च न्यायालयाचा लोकशाही प्रक्रिया सुरू ठेवण्यावर भर - ॲड. महेश धनावत

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमधील ५०% आरक्षण मर्यादेच्या मुद्द्यावर आज, मंगळवार, दिनांक २५ नोव्हेंबर रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. राज्य सरकारने राज्य निवडणूक आयोगाशी सल्लामसलत करण्यासाठी वेळ मागितल्याने न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारपर्यंत पुढे ढकलली आहे.

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जयमाल्य बागची यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत, राज्य निवडणूक आयोगाच्या वतीने बाजू मांडणारे ज्येष्ठ वकील बलबीर सिंग यांनी माहिती दिली की, राज्यातील २४२ नगर परिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुका २ डिसेंबर रोजी घेण्यासाठी आधीच अधिसूचना जारी करण्यात आली आहे. या एकूण २८८ स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी ५७ संस्थांमध्ये आरक्षणाची ५०% मर्यादा ओलांडली गेली आहे, असेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. जिल्हा परिषदा, महानगरपालिका आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका अद्याप अधिसूचित झालेल्या नाहीत, अशी माहितीही त्यांनी दिली.

यावर न्यायालयाने तोंडी निरीक्षण नोंदवले की, ज्या ५७ संस्थांमध्ये ५०% पेक्षा जास्त आरक्षण आहे, तेथील निवडणुकीचा निकाल या प्रकरणाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहील. तसेच, भविष्यात ज्या निवडणुका अधिसूचित केल्या जातील, त्यामध्ये ५०% आरक्षण मर्यादेचे पालन करण्याचे निर्देशही न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले.

या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश धनावत यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, सर्वोच्च न्यायालयाच्या आजच्या निरीक्षणांवरून हे स्पष्ट होते की, न्यायालय निवडणुका पुढे ढकलण्याच्या किंवा स्थगित करण्याच्या बाजूने नाही. 'तळागाळातील लोकशाही पुनरुज्जीवित झाली पाहिजे' आणि 'आम्ही निवडणुकांना परवानगी देऊ' यांसारखी सरन्यायाधीशांची विधाने सूचित करतात की, जी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली आहे, ती थांबवली जाणार नाही. न्यायालयाने एक व्यावहारिक तोडगा काढण्याचा प्रयत्न केला आहे, ज्यानुसार अधिसूचित निवडणुका होतील, परंतु ज्या ५७ ठिकाणी आरक्षणाची मर्यादा ओलांडली आहे, तेथील निकाल सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाच्या अधीन असेल. याचा अर्थ, २ डिसेंबर रोजी होणाऱ्या निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता अत्यंत कमी आहे.



तथापि, आरक्षणाच्या वैधतेचा कायदेशीर लढा सुरूच राहील. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले आहे की, निवडणुका कायद्याच्या विरोधात झाल्याचे आढळल्यास त्या रद्द केल्या जाऊ शकतात. त्यामुळे, सध्या तरी निवडणुका होणार, पण आरक्षणाचा तिढा सुटलेला नाही, असे चित्र आहे.

सुनावणीदरम्यान, ज्येष्ठ वकील विकास सिंह यांनी निवडणुका स्थगित करण्याची मागणी केली, तर ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी निवडणुका थांबवण्यास विरोध करत सांगितले की, निवडणुकीचा निकाल न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधीन ठेवला जाऊ शकतो. ओबीसींना वगळून लोकशाही असू शकत नाही, असे महत्त्वपूर्ण विधान सरन्यायाधीशांनी केले.

या प्रकरणाची पुढील सुनावणी शुक्रवारी होणार असून, त्या दिवशी राज्य निवडणूक आयोगाकडून अतिरिक्त माहिती सादर केली जाण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे भवितव्य या सुनावणीवर अवलंबून असेल.

# सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांना २६ व्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली



## रामनगर साखर कारखाना परिसरात दुग्धाभिषेक, कारखाना पुनरुज्जीवित करण्याचा शेतकरी संघर्ष समितीचा निर्धार

**जालना । प्रतिनिधी -** सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांची २६ वी पुण्यतिथी रामनगर साखर कारखाना परिसरात अत्यंत भक्तीपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. साखर कारखाना परिसरातील बाळासाहेबांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करण्यात आला, तसेच पुष्पमाला अर्पण करून त्यांचे पुण्यस्मरण करण्यात आले.

यावेळी साखर कारखाना बचाव कृती समितीचे अध्यक्ष अंकुश आप्पा देशमुख, ज्येष्ठ संचालक अंकुश राऊत, कमलाकर अंभोरे, सुरेश खडके, ॲड. सोपानराव भांदर्गे, अरुण ओझरकर, प्रल्हाद हेकाडे, सुभाष कोळकर, कैलास फुलारी, रावसाहेब पवार, लक्ष्मण शिंदे, नारायण वाडेकर, भाऊसाहेब मदन, आणि देशमुख मुळे यांच्यासह परिसरातील शेतकरी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून बाळासाहेब पवार यांच्या कार्याला उजाळा दिला, तसेच कारखाना विक्रीच्या निर्णयावर तीव्र टीका केली.

शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष अंकुश देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले की, रामनगर कारखाना सुस्थितीत असताना केवळ राजकीय षडयंत्र करून शेतकऱ्यांच्या हक्काचा कारखाना विकण्यात आला. बाळासाहेबांचे सहकाराचे स्वप्न धुळीस मिळवणाऱ्या लोकांचा हा डाव होता.

यावेळी अंकुशराव राऊत आणि कैलास फुलारी यांनीही मनोगत व्यक्त केले. संघर्ष समितीने यावेळी तीव्र निर्धार व्यक्त केला की, बाळासाहेबांच्या पुढील पुण्यतिथीपर्यंत पुन्हा हा कारखाना शेतकऱ्यांच्या वतीने कसा चालू करता येईल, यासाठी शेतकरी संघर्ष समिती प्रयत्न करेल. शेतकऱ्यांच्या हितासाठी हा कारखाना पुनरुज्जीवित करण्याचा संघर्ष समितीचा प्रयत्न असेल, असे प्रतिपादन मान्यवरांनी यावेळी केले.